# समाजक्रांतीचे तेजोवलय : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**प्रा. डॉ. मनोज गं. राठोड,** समाजशास्त्र विभागप्रमुख , स्व. पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालय वरुड जि. अमरावती. E-Mail profmanojgrathod@gmail.com

---

राजकीय स्वातंत्र्याला सामाजिक समतेची जोड देऊन ख-या मानवमुक्तीचा ध्यास घेणाऱ्या भारतीय नेत्यांच्या थोर परंपरेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मुकुटमणी आहेत.

भारताला हजारो वर्षे विकसित होत असलेली परंपरा आहे. या परंपरेत सनातनी मानसिकतेचा एक जुनाट वर्ग तसाच कायम राहीला आहे. या वर्गाने समाजात जातीय विषमता पेरली आणि माणसा-माणसात दुराव्याचे व तेढीचे बीज रोवले. परंपरेचा प्रवाह शक्तिशाली असला तरी त्याला या मानसिकतेचे किटाळ वाहून नेता आले नाही. या दुष्टचक्राविरुद्ध संघर्ष करण्याची व त्याला लागणारे वैचारिक, बौद्धिक, व मानसिक क्रांतीचे हत्यार वंचितांच्या हाती देण्याची किमया ज्या एका महापुरुषाला साधली, त्याचे नाव डॉ. भिमराव रामजी आंबेडकर.

बाबासाहेब आंबेडकर यांनी संपूर्ण आयुष्य माणसाच्या मुक्तीसाठी पणाला लावले. यासाठी त्यांनी आवश्यक असलेली अपार ज्ञानसाधना केली. मुक्तीचा लढा केवळ मानसिकच नव्हे तर बौद्धिक आणि वैचारीक पातळीवरही लढावा लागतो याचे भान असल्याने धर्मशास्त्र ते अर्थशास्त्र, इतिहास ते विधिशास्त्र आणि समाजशास्त्र ते राज्यशास्त्र असे सारे विषय त्यांच्या वास्तव प्रयोगानिशी त्यांनी आत्मसात केले. त्यांनी दिलेल्या लढ्यात प्रचंड यातना सहन कराव्या लागल्या असल्या तरी एक दिवस या देशानेच त्यांना आपल्या संविधानाचे शिल्पकार बनवले. न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता व धर्मनिरपेक्षता या मानवी मूल्यांची प्रेरणा तर या संविधानातून त्यांनी दिलीच, शिवाय या मुल्यांविरूद्ध जाणारी माणसे आणि प्रवाह हे समाजाचे शत्रू असल्याचा संस्कारही त्यातुन त्यांनी घडविला. प्रगतीच्या प्रवासात आणि अस्मितांच्या उन्मादात माणूस हरवू नये, त्याचे माणूसपण कायम राहून त्याला विकास आणि प्रगतीसह उन्नत होण्याच्या सर्व संधी प्राप्त व्हाव्या, ही त्यांची मनीषा होती. त्यासाठी त्यांनी शिक्षण हे महत्त्वाचे साधन मानून ,ते मिळवण्याची जिद्द समाजात उभी केली. माणसाला माणसांपासून वेगळे होऊ न देण्यासाठी बंधुता या मूल्याची त्यांनी पाठराखण केली. शिवाय, आपल्या वाट्याला आलेल्या विषमतेच्या व जातीयतेचा यातना दुसऱ्या कोणाच्या वाट्याला येऊ नयेत, यासाठी सारे आयुष्य त्यांनी वेचले. राजकीय स्वातंत्र्याला सामाजिक समतेची जोड देऊन खरे मानवमुक्तीचा ध्यास घेणाऱ्या भारतीय नेत्यांच्या थोर परंपरेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मुकुटमणी आहेत.

स्वतंत्र भारताचं संविधान निर्माण करण्याची संधी डॉ.आंबेडकरांना प्राप्त झाल्यामुळे दलितांच्या हक्कांची तरतूद त्यांनी संविधानातच केली. त्यामुळे दलित फेडरेशनच्या जागी नवीन वातावरणात, नव्या विचारांवर आधारित राजकीय पक्षाची त्यांना गरज भासणं स्वाभाविक होतं .सामाजिक विषमतेत गुलामगिरीचं जीवन जगण्यास बाध्य करण्यात आलेल्यांना त्यातुन मुक्त करण्यासाठी त्यांनी अविरत संघर्ष केला, हे वास्तव आहे. पण, त्याचवेळी त्यांच्या एकुण चळवळीचा, आंदोलनाचा, वैचारिकतेचा केंद्रबिंदू 'माणूस' होता,मग तो कोणत्याही जाती-धर्माचा असो, ही बाब त्यांच्या राजकीय प्रवासात प्रकर्षानं जाणवते.भारताच्या सामाजिक जीवनाला दिशा देणाऱ्या या महानायकाने असहिष्णुतेच्या विरोधात सातत्याने प्रखर लढा उभा केला. मागासवर्गीय समाजाला पिण्याच्या पाण्याच्या हक्क मिळवून देण्यासाठी महाड येथे चवदार तळ्याच्या सत्याग्रह केला. दलित समाजाला हिंदू मंदीरांत सन्मानाने प्रवेश मिळावा,यासाठी नाशिकला काळाराम मंदीर सत्याग्रह केला. बाबासाहेबांच्या सामाजिक संघर्षाची ही दोन ज्वलंत प्रतीके आहेत. माणुसकीच्या आग्रहासाठी झालेल्या या सत्याग्रहांनी देशभर दलित समाजात अस्मिता जागवली. 'शिक्षणाची कास धरा, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा अद्वितीय गुरुमंत्र बाबासाहेबांनी दलित समाजाला दिला. डॉ. बाबासाहेबांना नवमानवतावादाचा संस्कार करणारं शिक्षण हवं होत. जात- धर्म-वर्ण नष्ट करणाऱ्या शैक्षणिक विचाराची बाब त्यांनी उचलून धरणं स्वाभाविक होतं. अस्पृश्य, गुलामगिरी, अप्रतिष्ठा यांचे दाहक काटे त्यांना जिव्हारी लागले होते हजारो वर्षाच्या काळोखानंतर त्यांना स्वातंत्र्य, समता आणि बंधूता या उच्चतम मूल्यांची किमंत कळलेली होती. ही मुल्ये म्हणजे गौतम बुद्धाने जगाला दिलेली अनमोल देणगीच होय. शिक्षण ही त्यांना

विकासाची पायवाट वाटत होती. विकासासाठी त्यांना स्वातंत्र्य हव होत आणि स्वातंत्र्य हे मूल्ये शिक्षणाशिवाय सापडणार नाही याची त्यांना खात्री पटलेली होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खुप मोठे विद्वान होते. त्यांना वाचनाची प्रचंड आवड होती. यासाठी त्यांनी आपल्या घरातच एक ग्रंथालय बनविले होते. आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी काही महत्वपुर्ण ग्रंथ लिहिले. ते ग्रंथ सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय द्रृष्ट्या फार महत्वाचे आहेत.

**निष्कर्ष** :-

ज्ञानसूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्य समाजासाठी महत्त्वपूर्ण आहे. बाबासाहेब आंबेडकर हे असामान्य व कुशाग्र बुद्धिमत्ता असलेले उच्च विद्यासंपन्न मनुष्य होते. त्यांचे सामाजिक सुधारणेसह शैक्षणिक क्षेत्रातील योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांचे जीवन, कार्य आणि विचार आजही सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तळागाळातील सर्वसामान्य माणूस सर्वशक्तीनिशी जागा केला. त्याला आत्मसन्मान, स्वाभिमान, अस्मिता आणि सामर्थ्याची जाणीव करून दिली. मानसिक गुलामगिरीतून मुक्त केले. हक्काने जगण्याचे शिकवले. त्यासाठी संघर्षाचे सत्याग्रह करून समता व न्याय समाजात निर्माण केली.

**संदर्भ –**

**1.डॉ. बाबासाहेब आंबेडकर – धनंजय कीर**

**2.विविध वृत्तपत्रातील लेख**